| MHAH070009082025 | नियमित जामीन अर्ज क्र.३८३/२०२५ आदेश नि.१<br>समाधान सोन्याबापू वैद्य वि. महा. सरकार |
|---|---|

१. प्रथमखबर वाचली असता असे निदर्शनास येते की, पिडीत वय १४ वर्षे ५ महिने ही वडगावपान येथे इयत्ता ८ वीचे शिक्षण घेत होती. तिच्या शाळेत गणेश रंगनाथ साबळे हे वॉचमनचे काम करतात. त्यांचा मावसभाउ कल्पेश नारायण धुळसैंदर हा पिडीतेच्या शाळेत येणेजाणेच्या रस्त्यावर नेहमी त्याचे चारचाकी गाडीमध्ये तिचा पाठलाग करत असे.

२. प्रथमखबर मध्ये पुढे असे नमुद केले आहे की, दि.०४.०४.२०२५ रोजी सकाळी ७.३० वा.चे सुमारास पिडीता शाळेच्यासमोर रस्त्यावर आली. त्यावेळी कल्पेश नारायण धुळसैंदर त्याची गाडी घेवून आला. पिडीतेला म्हणाला की, "तु आता माझ्यासोबत बाहेर फिरायला चल". पिडीतेने नकार दिला, त्यावेळी कल्पेश नारायण धुळसैंदरने पिडीतेचा हात धरुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व पिडीतेला जबरदस्तीने गाडीत बसवून क–हे घाट येथील मारुती मंदीरात नेले. कल्पेश नारायण धुळसैंदर पिडीतेला म्हणाला की "मला तुझ्याशी लग्न करायचे आहे”. त्यास पिडीतेने नकार दिला. त्यानंतर कल्पेश नारायण धुळसैंदरने पिडीतेला सकाळी ११.३० वा.चे सुमारास तिच्या शाळेत आणून सोडले. या आशयाची प्रथमखबर पिडीतेने कल्पेश नारायण धुळसैंदर व गणेश साबळे यांच्याविरुद्ध दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता अधिनियम कलम ७८, ३(५) व बालकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ११(४), १२ अन्वये गुन्हा रजि. क्र.२५१/२०२५, दि.०७.०४.२०२५ रोजी सायंकाळी ७ वा. संगमनेर तालुका पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला.

३. पिडीत मुलीने पुन्हा दि.३०.०७.२०२५ रोजी पुरावा जबाब दिल्याने बीएनएस कलम ६४, ६५(१), १३७(२) व बालेकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ४ हे वाढीव कलम लावण्यात आले. तपासात पुढे निष्पन्न झाले की, **आरोपी क्र.३ समाधान वैद्य हा उपरोक्त नमुद आरोपी क्र.१ व २ चा मावस भाऊ आहे.**

**आरोपी क्र.१ व २ यांचेवर गुन्हा दाखल असल्याचे आरोपी क्र.३ समाधान वैद्य यास माहित असतांनाही त्याने पिडीत मुलीस संपर्क करणेसाठी स्वतःचा मोबाईल दिलेला असून त्यावर येणारे फोन व मेसेज हे आरोपी क्र.१ यास दिलेले असून आरोपी क्र.३ याचे मोबाईलवरुन पिडीतेचे आईचे फोनवर २०० पेक्षा अधिक फोन कॉल व मेसेजचे आदान प्रदान झालेले आहे. तसेच पोलीस पथक आरोपी क्र.१ यास पकडण्यासाठी गेले असता आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.३ याचे घरातून पोलीसांची चाहूल लागताच पळून गेला होता. अर्जदार/आरोपी क्र.३ ने आरोपी क्र.१ यास सहाय्य केले आहे.** आरोपी क्र.३ ने गुन्हयास अपप्रेरणा दिली.

४. अर्जदार/आरोपी समाधान सोन्याबापू वैद्य याचे जामीन अर्जातील कथन व त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.के.पवार यांचा युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी निष्पाप आहे. अर्जदार/आरोपीचा सदर गुन्हयाशी कोणताही संबंध नाही. अर्जदार/आरोपी हा गुन्हयातील आरोपी क्र.१ चा मावस भाउ असल्याने त्याला सदर गुन्हयात गोवण्यात आले आहे. अर्जदार/आरोपी एफ वाय बी ए चे शिक्षण घेत आहे. प्रथमखबर तीन दिवसांचे विलंबाने दाखल असून त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण नाही. आरोपी क्र.१ ने पिडीतेस मोटारसायकलवर बसवून करुले येथील म्हसोबा मंदीराचे पाठीमागे असणा–या खोलीत नेऊन तिला फोटो व्हायरल करण्याची, आईवडीलांना मारण्याची धमकी देवून तिच्याशी शारिरिक संबंध केले याबाबत ८५ दिवसांनी म्हणजेच दि.३०.०७.२०२५ रोजी वरील घटनेबाबत पुरवणी जबाब दिलेला आहे. त्यानुसार बीएनएस व पोक्सो प्रमाणे वाढीव कलमे लावलेली आहेत. फिर्यादचे अवलोकन केले असता फिर्यादीत, पुरवणी जबाबात कोठेही अर्जदार/आरोपीचा गुन्हयात सहभाग होता किवा सदर गुन्हा करण्यास अर्जदार/आरोपीने सहकार्य केले आहे असे नमुद केलेले नाही. अर्जदार/आरोपीने फिर्यादी अथवा तिचे कुटुंबियांना केव्हाही कोठेही धमकी दिली नाही किंवा आरोपीस गुन्हा करण्यास सहकार्य केले नाही. अर्जदार/आरोपीचा शेती, ट्रॅक्टर व मका कुट्टी करण्याचा व्यवसाय आहे. अर्जदार/आरोपीचा आरोपी क्र.१ यास व्यवसायाचे कामी मजुरांची गरज पडल्यास कामात मदत करण्यासाठी येत असे. याव्यतिरिक्त अर्जदार/आरोपीचा अन्य आरोपीशी कुठलाही संबंध नाही.

अर्जदार/आरोपीविरुद्ध कोणताही ठोस पुरावा नाही. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण झाला आहे. अर्जदार/आरोपीकडून कुठलीही जप्ती नाही. अर्जदार/आरोपीचे शिक्षण चालू असून तो जेलमध्ये राहिल्यास त्याचे शिक्षण व आयुष्य उद्ववस्त होईल. आरोपी क्र.२ गणेश रंगनाथ साबळे यास न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे समान न्यायतत्वाचे आधारे अर्जदार/आरोपीस जामीन मंजूर करण्यात यावा. अर्जदार/आरोपी पुराव्यात हस्तक्षेप करणार नाही. न्यायालयाचे अटींचे व शर्तींचे पालन करेल.

५. अर्जदार/आरोपीचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.के.पवार यांचा पुढे युक्तीवाद आहे की, सदरची घटना दि.०५.०४.२०२५ रोजी घडली. दि.३०.०७.२०२५ रोजी पुरवणी जबाब दिल्यानंतर बीएनएस कलम ६४, ६५(१), १३८ व पोक्सो कलम ४ वाढविण्यात आले. अर्जदार/आरोपीचे नाव प्रथमखबरमध्ये नाही. त्याने अन्य आरोपींना गुन्हयासाठी उद्युक्त केले नाही, मदत केली नाही, कट केला नाही. अर्जदार/आरोपीने गुन्हा घडल्यानंतर आरोपी क्र.१ ला घरी आश्रय दिला. अर्जदार/आरोपीने आरोपी क्र.१ ला गुन्हयासाठी उद्युक्त केले नाही. गुन्हयानंतर अर्जदार/आरोपीचा मोबाईल आरोपी क्र.१ ने वापरला. अर्जदार/आरोपीने आरोपी क्र.१ ला पळून जाण्यासाठी मदत केली नाही. आरोपी क्र.१ हा अर्जदाराचा वाहन चालक आहे. आरोपी क्र.२ ला जामीन मंजूर झाला असून त्याप्रमाणे समान न्यायतत्वाचे आधारावर अर्जदार/आरोपीस जामीन मिळावा.

६. अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. पी.बी.वाघ यांचे म्हणणे नि.५ मधील कथन व युक्तीवाद असा आहे की, सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा, शरीराविरुद्धचा, स्त्री अत्याचाराचा व बाल लैगिंक अत्याचाराचा असून घटनेचा तपास चालू आहे. आरोपी क्र.१ हा सदरचा गुन्हा करुन फरार होता हे माहित असून सुद्धा त्यास कृत्य करण्यासाठी साथ दिली आहे. अर्जदार/आरोपी व आरोपी क्र.१ व २ हे एकमेकांचे मावस भाऊ आहेत. अर्जदार/आरोपीने आरोपी क्र.१ यास पिडीत मुलीशी त्याच्या मोबाईलवरुन संपर्क करण्यास मदत केली आहे. अर्जदार/आरोपीने त्याच्या मोबाईलवरुन पिडीतेच्या आईच्या मोबाईलवर २०० पेक्षा अधिक फोन कॉल व मेसेज आदान प्रदान केले आहे. दि.२९.०५.२०२५ ते ०४.०६.२०२५ पावेतो आरोपी क्र.१ हा अर्जदार/आरोपी

बरोबर होता व त्यांनी पिडीतेच्या आईच्या मोबाईलवर संपर्क करुन पिडीतेशी बोलणे केलेले आहे. पोलीस पथक आरोपी क्र.१ चा शोध घेण्यासाठी अर्जदार/आरोपीच्या घरी गेले असता आरोपी क्र.१ त्याच्या घरातून पळून गेला. त्यावेळी अर्जदार/आरोपीने गुन्हा घडल्याचे माहित असतांना देखील आरोपी क्र.१ यास घरात ठेवले. आरोपी क्र.१ ने पिडीतेला गुन्हा घडलेनंतर व गुन्हा दाखल झाल्यानंतर पुन्हा संपर्क करुन पिडीतेशी शारिरिक संबंध केलेले आहेत. त्यासाठी अर्जदार/आरोपीने आरोपी क्र.१ यास मदत केल्याचे दिसून येते. सदरच्या गुन्हयातील आरोपी क्र.४ गायकवाड हा कोण आहे याबाबत अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. आरोपी क्र.१ ने अर्जदार/आरोपीच्या वडीलांची दुचाकी सदर गुन्हा करतांना वापरलेली आहे. अर्जदार/आरोपीने अजून काय मदत केली याबाबत सखोल तपास चालू आहे. अर्जदार/आरोपी पुन्हा अशा प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार/आरोपीस कायदयाचा धाक राहणार नाही. अर्जदार/आरोपीस जामीन दिल्यास न्यायालयात हजर राहण्याची शक्यता नाही. अर्जदार/आरोपी फिर्यादी व साक्षीदारांना धमकावून गुन्हयातील पुरावे नष्ट करण्याची शक्यता नाकारता येत नाही. पिडीत मुलीला त्रास देण्याचे व छेडछाड करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

७. अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. पी.बी.वाघ यांचा पुढे युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी हा आरोपी क्र.१ चा मावस भाऊ आहे. गुन्हा घडला आहे हे माहित असतांना देखील अर्जदार/आरोपीने अर्जदार क्र.१ यास घरात ठेवून घेतले. दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत जामीन देवू नये.

८. विवाद्य कथने, अभियोग पक्षाने दाखल केलेली तपासाची कागदपत्रे व युक्तीवाद साकल्याने विचारात घेतला. अर्जदार/आरोपी क्र.३ यास दि.१८.०९.२०२५ रोजी अटक झाली. आरोपीस १९.०९.२०२५ रोजीपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. त्यानंतर अर्जदार/आरोपी क्र.३ न्यायालयीन कोठडीत आहे.

९. २०२५ सालच्या सदर खटल्यामध्ये दोषारोपपत्र दाखल होवून, दोषारोप निश्चिती करुन, साक्षीदारांचे पुरावे नोंदवून न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी लागेल.

इतका कालावधी अर्जदार/आरोपी क्र.३ यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे प्रयोजन शिल्लक राहिलेले नाही. जामीन हा नियम असून कैद हा अपवाद आहे. सबब अर्जदार हा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८३ च्या तरतुदी अन्वये जामीनास पात्र आहे.

**आदेश**

अ. नियमित जामीन अर्ज क्र. ३८३/२०२५ मान्य केला आहे.

ब. संगमनेर तालुका पोलीस ठाणेचा गुन्हा रजि.क्र.२५१/२०२५ चे कामी अर्जदार/आरोपी समाधान सोन्याबापू वैद्यचा रक्कम रुपये ५०,०००/– चा वैयक्तिक जात मुचलका व जामीनदार स्वीकारुन त्यास जामीनावर मुक्त करण्यात यावे.

क. गुन्हा रजि. क्रमांक २५१/२०२५ मधील फिर्यादी व साक्षीदार यांच्याशी अर्जदार/आरोपीने कोणत्याही स्वरुपाचा संपर्क करु नये, त्यांच्यावर दबाव, दडपण, धाक, अमिष, प्रलोभन ईत्यादींचा वापर करु नये.

ड. गुन्हा रजि. क्रमांक २५१/२०२५ चे पुराव्यामध्ये व तपासामध्ये अर्जदार/आरोपीने कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करु नये व पुराव्यात छेडछाड व फेरफार करु नये.

इ. अर्जदार/आरोपी व जामीनदार यांनी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना यांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची सत्यप्रत जामीन देतेवेळी सादर करावी.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.06 17:06:43 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक –०६/१०/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर.